# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र.: १३१ / २०१६

**'' ह.भ.प. योगमहर्षी राष्ट्रीय किर्तनकार, रामचंद्र गोपाळ शेलार ऊर्फ शेलारमामा सुवर्णपदक २०१६—१७''**

**विज्ञान विद्याशाखा ( पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय / विद्यापीठ विभागातील विज्ञान विद्याशाखा आणि विज्ञानेतर विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यास दरवर्षी आलटून—पालटून **'' ह.भ.प. योगमहर्षी राष्ट्रीय किर्तनकार, रामचंद्र गोपाळ शेलार ऊर्फ शेलारमामा सुवर्णपदक''** प्रदान करण्यात येते. सन २०१५—१६ मध्ये **विज्ञान विद्याशाखा** पदव्युत्तर अभ्यासक्रमातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यास विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभात हे सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार आहे.

या परिपत्रकाद्वारे सर्व विद्यापीठ विभागप्रमुख / प्राचार्य / संचालक यांना कळविण्यात येते की,**''ह.भ.प. योगमहर्षी राष्ट्रीय किर्तनकार, रामचंद्र गोपाळ शेलार ऊर्फ शेलारमामा सुवर्णपदक''** साठी खाली उल्लेख केलेल्या नियम व अटी नुसार विद्यार्थ्यांची माहिती आवश्यक कागदपत्रे व शिफारशीसह **दि. ०६ सप्टेंबर २०१६** पूर्वी शैक्षणिक प्रवेश विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे प्रत्यक्ष (हस्तपोच) सादर करावे. तद्नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**नियम व अटी :**

१) सदर पारितोषिक शैक्षणिक वर्ष २०१५—१६ मध्ये विज्ञान विद्याशाखातुन पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये विषेश गुणवत्ता प्राप्त केलेल्या एका विद्यार्थ्यास प्रदान करण्यात येईल.

२) इयत्ता दहावी, बारावी व पदवी परीक्षेतील गुण हे प्रथम वा द्वितीय क्रमांकाच्या पात्रतेचे असावेत.

३) विद्यार्थी भारतीय संस्कृती, आचार, विचार, भारतीय परंपरा मानणारा व स्वतःच्या दैनंदिन जीवनात आचरण करणारा असावा.

४) विद्यार्थी सर्व भारतीय व परदेशी क्रीडा तसेच वैयक्तिक व सांघिक अशा क्रीडा स्पर्धांमध्ये जास्तीतजास्त पारिताषिके मिळविलेला असावा. यामध्ये ध्यानधारणा, प्राणायम, योगासने करणाऱ्या विद्यार्थ्यास प्राधान्य द्यावे.

५) गायन, नृत्य, वक्तृत्व, नाटय व इतर कलांमध्ये नैपुण्य प्राप्त केलेला असावा.

६) रक्तदान, श्रमदान, पर्यावरण रक्षण व प्रदूषण नियंत्रण कार्य, साक्षरता व स्वच्छता मोहीम तसेच एड्स रोगाविरूध्द जनजागरण मोहिम इ. मध्ये सहभाग असावा.

७) विद्यार्थी शाकाहारी व निर्व्यसनी असावा.

८) पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विद्यार्थी उपलब्ध नसल्यास पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्याचा विचार करण्यात येईल.

९) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थ्याला अध्यादेश क्र. १०९, ११० व १४३ ची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१०) अध्यादेश क्र. १६८ नुसार परीक्षेस बसणारा विद्यार्थी सुवर्णपदकास पात्र ठरणार नाही.

गणेशखिंड,पुणे—७ )<br>
संदर्भः—शै.प्रवेश / ३०३२ )<br>
दिनांक: १२ / ०८ / २०१५ )

सहा.कुलसचिव,<br>
शैक्षणिक प्रवेश विभाग